# ईश्वरी सुसंगती

## विसंगतीच्या गाभऱ्यात सुसंगती आहे.

गोष्टी दिसतात तशा नसतात. जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीचा छेदलेला भाग पहाता तेव्हा त्याचा पूर्ण अर्थ कळत नाही. जेव्हा तुम्ही ती गोष्ट संपूर्ण पहाता तेव्हा एक अर्थपूर्ण चित्र उभारते. त्याचप्रमाणे विश्वाच्या निर्मितीचे उत्कृष्ट चित्र देश कालाच्या कॅनव्हासवर चितारलेले असते. प्रत्येक वस्तू आणि घटना ही परमेश्वरी चित्रकाराचे बहारीचे काम आहे. सामान्य माणूस ह्या चित्राचे गोंधळविणारे छोटे तुकडे पहात असतो.

जे काही होत आहे ते ईश्वरी संगीतकाराच्या संगीतातील एक सूर आहे. एक एक सूर, जोपर्यंत संपूर्ण संगीत ऐकले जात नाही तोपर्यंत अर्थपूर्ण वाटत नाही. ब्रह्माची प्रमुख कलाकृती,जी विश्वपटलावर खेळत असते, त्यात सर्व काही-वादळे, मृत्यु, प्रेम, जीवन-त्या रागमालेत येतात. सर्वकाही विश्वव्यापी एकवाक्यतेच्या तालात, परमेश्वराबरोबरच्या ध्यानात एकरूप झाल्यावर कळते. भगवद्‌गीतेमध्ये, विश्वरूप दर्शन योगात, श्रीकृष्णाने अर्जुनाला विसंगतीमध्ये दिसणारी दिव्य सुसंगती, विश्वाच्या बदलत राहणाऱ्या गोष्टींच्या गाभ्यातील अतूट सुसंगतीचे दर्शन घडविले. भगवान म्हणतात "माझ्या सर्वव्यापी मंदिरातील जगद्‌व्याळ मूर्ती पहा-तिच्यात सर्व देव, मनुष्ये आणि निसर्ग आहेत."

माणसाची विषयग्रहणशक्ति किती छोटी असते. तुम्हाला कान आहेत पण खरोखरीच तुम्ही ऐकता? तुम्हाला डोळे आहेत परंतु तुम्ही खरोखरीच पहाता? तुम्हाला हृदय आहे तरीही तुमच्या भावना योग्य आहेत? तुम्हाला आत्मा आहे परंतु

तो ईश्वराचे शुद्ध चैतन्य व्यक्त करतो? जे काळोखात जगतात ते काळोखच पहातील आणि जे उजेडात जगतात ते उजेडच पहातील. ज्यांच्या हृदयात सामंजस्य असते ते सर्व सृष्टीत केवळ सामंजस्यच पाहतील. ज्यांच्यात सामंजस्य नसते ते सर्व जगतात सामंजस्याचा अभाव पाहतात. अस्ताव्यस्त मन सर्वत्र गोंधळच पहाते. शांतीचा अनुभव न घेतल्यास शांती काय आहे ते कसे कळेल? ज्यांनी आपल्यात शांती अनुभव केली आहे ते बाहेर बेबनाव असला तरीही शांतीमध्येच रहातात.

भारतात एक योगी होता ज्याची पत्नी क्रोधाची मूर्ती होती. सॉक्रेटीसच्या पत्नीपेक्षासुद्धा ती शीघ्रकोपी होती. योग्याची कोणतीही गोष्ट तिचे समाधान करीत नसे किंवा तिला योग्य वाटत नसे. शेजाऱ्यांनीसुद्धा तिच्या वादळी स्वभावाची तक्रार केली. योग्याने त्याच्या नैसर्गिक चांगूलपणाने आणि आतील शांत स्वभावाने तिच्याकडे, तिला वेळच बदलेल, ह्या आशेने दुर्लक्ष केले. परंतु तिला योग्याची चीड येऊन त्याच्या अव्यवहारीक धार्मिकतेला संपवायचा निश्चय केला होता. सर्व सैतानी पद्धतीत माघार घ्यायला लागल्यानंतर तिने योग्याची सर्व पुस्तके आणि घरसुद्धा जाळून टाकायचा निश्चय केला. त्यावेळेस योगी तिच्या जवळ जाऊन तिला म्हणाला, "प्रिये, मी तुझ्यावर आता पूर्वीपेक्षा जास्त प्रेम करतो. तू माझ्यासाठी परमेश्वरी देणगी आहेस. इतके दिवस तू मला सहनशीलता शिकविलीस. आता तू माझे शेवटचे दौर्बल्य नाहिसे केले आहेस, माझी पुस्तके आणि माझ्या घराची आसक्ति" कोण आणि काय योग्याची चित्तवृत्ती विघटित करेल?

## आपण स्वप्नांमागे धावत आहोत.

आपल्याजवळ असलेल्या गोष्टी आपण नेहमीच पाहतो असे नाही. आपल्यापाशी असलेला ठेवा आपण दुर्लक्षित करून आपण स्वप्नांमागे धावत असतो. आपण काळोखात संरक्षण शोधित असतो परंतु आपल्याला प्रकाश हवा असतो. आपण तहान न भागविणाऱ्या सोनेरी स्वप्नांमागे धावत असतो, परंतु आपला आत्मा परमेश्वरासाठी तहानेला असतो.आपण वाळवंटातील नसलेल्या मृगजळाच्या निवास देणाऱ्या आडोशासाठी धावत असतो, याचना असते शांतता आणि एकवाक्यतेच्या हिरवळीची, जी आपल्या आंतरात आहे. विसंगती आणि अनेकता जी आपल्याला बाह्यजगतात खुणावत असते, तो केवळ आंतर्जीवनाचा सावलीपट आहे. बाहेर जाणारा मानसिक चंचलपणा थांबवा आणि मनाला आत आणा. तुमचे विचार आणि इच्छा ह्यांना सर्व सिद्धी देणाऱ्या सत्यतेबरोबर, जी तुमच्या हृदयात आहे, तिच्याबरोबर यथारूप करा. नंतर तुम्हाला तुमच्या आयुष्यात आणि निसर्गात असलेली सुसंगती दिसेल. तुमच्या आशा आणि अपेक्षा ह्यांना ह्या आनुषंगीक सुसंगतीबरोबर एकवाक्य केले तर तुम्ही शांतीच्या हिंमत देणाऱ्या पंखांबरोबर आयुष्यात तरंगू शकाल. योगाचे सौंदर्य आणि गहराई अविचलित स्थिरतेची साठवण करण्यात आहे.

## एकवाक्यता प्रेम आणि चातुर्यातून जन्माला येते

एकवाक्यता प्रेम आणि चातुर्यातून जन्माला येते. ही शुद्ध आणि दुसऱ्यांप्रत पोहोचणाऱ्या अंत:करणाची अपत्ये आहेत. मानसिक शुद्धता, मनाच्या चांगले आणि वाईट ह्यांचे निराकारण करणाऱ्या, वाईटाला नाकारणाऱ्याला आणि चांगल्यावर नेहमी राहण्याने येते. पुन:पुन्हा करण्याने आणि निवडून चांगल्या कार्यांच्या प्रयोगाला बळकटी देण्याने विवेक सदाचरणी सवय बनतो. जेव्हा विभिन्न विचारांचे भांडण,

वाईट विचारांना दूर केल्याने थांबते, तेव्हा आयुष्यात आत आणि बाहेर सुसंगती तयार होते. जेव्हा जेव्हा तुमचे विचार पारिवारीक भांडणात गुंतून पडतात, तेव्हा त्यांच्या भेदावर विवेकाने मध्यस्थी करा आणि पहा! दु:खदायक विसंगती तुमचे मन ग्रासणार नाही. योगाभ्यास करणाऱ्यांनी हा पुरावा दिला आहे.

मन ही निसर्गाची भट्टी आहे, जेथे, मनातील मळ,जो राखण्यायोग्य नाही, त्याला भस्म करता येते; तुमचे वाईट विचार, चुकीच्या कल्पना आणि तक्रारी, नातेसंबंधातील बेबनाव.जर तुम्ही आपल्या मनात सोडवलात, तर असा कोणताही संबंध नाही, ज्यात स्नेहाचा कितीही अभाव असो, त्याचा समेट करता येणार नाही. भयंकर परिणाम होणार असले तरीही परिणामांना भिऊ नका. कोणतेही काम करण्याअगोदर ती वस्तुस्थिती विवेक आणि चातुर्याने तुमच्या मनात सुसंगत करा परिणाम आपोआपच येईल. बेबनाव असलेल्या जगतात मनाची सुसंगती एकवाक्यता आणेल.